पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ९४९ /२०१३
दिनांक : १४ / १० / २०१३

प्रति,

मा.......................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची सभा दिनांक **१८/१०/२०१३** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१८/१०/२०१३** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८.
मा.विधी समिती सभा
**कार्यपत्रिका क्रमांक १०**

दिनांक : **१८/१०/२०१३** वेळ : दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१८/१०/२०१३** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २०/०९/२०१३ व २७/०९/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.८)** सभावृत्तांत कायम करणे.

**विषय क्र.१)** मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये स्थापत्य विषयक व सुधारणा कामे करणेकामी येणा-या र.रु.२२,५०,०००/- (अक्षरी र.रु.बावीस लाख पन्नास हजार फक्त ) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.२)** प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या मनपा क्रीडा धोरण मसुद्यास मा.विधी समितीमार्फत मा. स्थायी समिती सभेची व मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.३)** सांगवी ते किवळे बीआरटीएस रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते डांगे चौक दरम्यान लक्ष्मणनगर येथे सबवे बांधणेचे कामास व याकामी येणा-या र.रु.३,८८,५५,५८६/- ( अक्षरी र.रु.तीन कोटी अठ्ठयाऐंशी लाख पंचावन्न हजार पाचशे शहाऐंशी फक्त ) चे खर्चास मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.४)** प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाचनालय वर्गणी अनामत व प्रवेश शुल्क वाढ करणेबाबत मा.विधी समिती मार्फत मा.स्थायी समिती व मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.५)** जलक्षेत्र क्र.ड/१२ पिंपळे गुरव परिसरातील गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणी पुरवठा बंद करणेकामी स.नं.७२ येथे २० द.ल.लि.क्षमतेची टाकी बांधणे या कामास सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात र.रु.१,३०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली असल्याने सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षासाठी या कामास र.रु.१,३०,००,०००/- चे रकमेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.६)** जुनी सांगवी येथे ६ लक्ष लिटर क्षमतेची टाकी पंप हाऊस व संप पाडून १५ लक्ष लिटर क्षमतेची नवीन टाकी बांधणे या कामास सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकात र.रु.१,१५,९५,६३३/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली असल्याने सन २०१३-१४ च्या आर्थिक वर्षासाठी या कामास र.रु.१,१५,९५,६३३/- चे रकमेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.७)** पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आरक्षणे तसेच निळी, लाल पुररेषा व नदीचे सर्वेक्षण करणे कामाच्या र.रु.२.५५ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.८)** पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नगरसचिव अभिनामाचे एक पद पे बॅन्ड र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. सदरचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकरीता दिनांक ३०/०७/२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येऊन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जामधून पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्याकरीता दिनांक २६/०९/२०१३ कर्मचारी निवड समिती सभा आयोजित करण्यात आली होती.प्रस्तुतच्या निवड समितीने पात्र उमेदवारांच्या मौखिक मुलाखती घेऊन उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव, व मुलाखतीमध्ये दाखविलेल्या प्राविण्या नुसार श्री. उल्हास बबनराव जगताप यांना सरळसेवा प्रवेशाने नगरसचिव पदावर र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधिन कालावधीकरीता मा.विधी / मा.महापालिका सभेच्या मान्यतेने नेमणूक देणेकामी शिफारस केली आहे. श्री.उल्हास बबनराव जगताप यांना नगरसचिव पदावर सरळसेवा प्रवेशाने र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणी मध्ये प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता नेमणूक देण्यास मान्यता मिळणेबाबत तसेच प्रस्तावात नमुद प्रपत्र अ प्रमाणे नगरसचिव पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या निश्चित करणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.९)** डॉ.यशवंतराव माने, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार १ वर्ष कालावधीकरीता नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ९४९ /२०१३
दिनांक : १४/१०/२०१३

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.